◆ T4T च्या प्रशिक्षणाबद्दल मी काय लिहू... अतुलनीय दृष्टांत! परमेश्वराचे अद्भूत कार्य!!! नैराश्येने ग्रासलेली पिढी पाहायचो त्यावेळी मी नेहमीच विचार करायचो. या पिढीसाठी कोण उभा राहील? मला असे वाटते की त्याचे एक उत्तर म्हणजे, T4T चे प्रशिक्षण. ह्या ठिकाणी मी शिकवण्यासाठी येत असतो T4T चा अभ्यासक्रम, अतिशय नीटनेटका, अचूक त्याचप्रमाणे या ठिकाणी तरुणांवर केले जाणारे संस्कार, शिस्त, खाण्याची व राहण्याची अतिउत्तम सोय ही शब्दात व्यक्तच करता येत नाही. आई वडिलांनो आपल्या मुलांच्या बाबतीत निराश होवू नका.. तुमच्या मुलांसाठी आशा आहे T4T चे प्रशिक्षण, या प्रशिक्षणासाठी आपल्या पाल्याला जरुर पाठवा!

**– पा. संजय फ्रांन्सिस** (संस्थापक, फोर्ज संस्था, बेळगाव)

◆ बऱ्याचदा लोकांकडून मला माझ्या मुलाबद्दल निराशेचे शब्द, ऐकायला मिळायचे. वाया गेलेला, उध्दट बोलणारा, व्यसनाच्या अधीन झालेला, याच्यामधून काहीच चांगल होणार नाही, कशाला जन्माला आला हा?... हे सर्व ऐकून हा आमचा मुलगा आहे हे सांगायला आम्हाला लाज वाटायची... पण आज मी आनंदाने सांगतो, की हा आमचा मुलगा आहे, याचे कारण म्हणजे त्याचे बदललेले जीवन, त्याच्या स्वभावात झालेला बदल.. याचे श्रेय जाते ते केवळ परमेश्वराला आणि T4T च्या प्रशिक्षणाला! जर आमच्या मुलाच्या जीवनामध्ये T4T च्या माध्यमातून परमेश्वराने भेट घेतली नसती तर आम्ही आमच्या मुलाला केंव्हाच गमावून बसलो असतो. परमेश्वरा तुझ्या अद्भूत दयेबद्दल व योजनेबद्दल धन्यवाद!

**– एक पालक**

◆ माझा संघर्ष चालू होता तो प्रेम या विश्वामध्ये. पण प्रेम या शब्दाचा मला नेमका अर्थ कधीच कळला नाही आणि आयुष्याच्या एका टप्प्यावर मी वाहत जाण्याच्या क्षणी येवून पोहोचलो... आणि याच दरम्यान माझ्या जीवनाला T4T च्या माध्यमातून एक वेगळी कलाटणी मिळाली. इथे मला कळले प्रेम आणि वासना काय आहे? माझ्या जोडीदाराविषयी परमेश्वर माझ्याकडून काय अपेक्षा करितो? आई-वडिलांच्या विश्वासाला तडा जाणे म्हणजे काय असते? असे भरपूर प्रश्न... पण परमेश्वराला मी धन्यवाद देतो की त्याने माझ्या अशा अनेक प्रश्नांची उत्तरे दिली व मला सावरले आणि यासाठी एक निमित्त ठरले ते म्हणजे T4T चे प्रशिक्षण! मी तरुण तरुणींना सांगेन, जीवनाचा खरा अर्थ समजून घेण्यासाठी T4T च्या प्रशिक्षणमध्ये सहभागी व्हा.

**– एक विद्यार्थी**



निसर्गरम्य प्रशिक्षण केंद्र



प्रशिक्षण घेताना विद्यार्थी



एक दिवसीय सहल



सांस्कृतिक कार्यक्रम



सर्टीफिकेट वितरण सोहळा

"Remember your creator in the days of your youth"
(Ecclesiastes 12:1)

# Training for Teens

## REFINE • MOLD • SHAPE

## TRINITY MINISTRIES

2353, 'D' Ward, Juna Budhwar Peth, Bramhapuri,
Kolhapur - 416 002. Mob. : 9860237095, 8600355111,
Website : www.trinitycpt.com

## ट्रिनिटी मिनिस्ट्रीज, कोल्हापूर याविषयी

त्रैक्य देवावर विश्वास ठेवून व त्याने दिलेल्या दर्शनावर भरवसा ठेवून कार्य करणारे आम्ही जिवंत प्रभू येशू ख्रिस्ताचे सेवक आहोत. आम्ही कोणत्याही एका पंथाचे नाही आहोत तरी त्रैक्य देवावर विश्वास ठेवून सेवाकार्य करणाऱ्या मंडळ्या व पास्टर यांच्या सोबत देवाच्या राज्याच्या वाढीसाठी एकत्र झटत आहोत.

## T4T च्या अभिवचनाविषयी

T4T अर्थात Training for Teens (तरुणांसाठी प्रशिक्षण) हे परमेश्वराकडून मिळालेले दर्शन आहे. तरुणांविषयी पवित्रशास्त्र सांगते, ''कोणी तुझ्या तारुण्याला तुच्छ मानू नये; तर भाषण, वर्तन, प्रीति, विश्वास व शुध्दता ह्यांविषयी विश्वास ठेवणाऱ्यांचा कित्ता हो.'' (१ तीमथ्थी ४:१२)

## T4T (Training for Teens) ची का गरज आहे?

आजच्या युगात सर्वात जास्त गोंधळलेला वर्ग म्हणजे तरुण वर्ग आहे. याची अनेक कारणे आहेत. यापैकी काही महत्त्वाची कारणे म्हणजे तरुणांना त्यांच्या जीवनाविषयीचे न समजलेले उद्देश, 'कुटुंब' या नात्याला गेलेला तडा, निर्माणकर्ता परमेश्वर आणि त्याचे सेवाकार्य याविषयीचा अज्ञानपणा, सामाजिक जीवनाचा अभाव व स्वत:नेच स्वत:भोवती सोशल मिडीयाच्या माध्यमातून निर्माण केलेले एक अभासी विश्व, करियर विषयीचा गोंधळ, प्रेम, वासना व लग्न यामध्ये होणारा मानसिक संघर्ष, याचा परिणाम म्हणजेच तरुणाच्यामध्ये वाढत चाललेले नैराश्य, वैफल्यग्रस्तता व हिसंकपणा हा आहे. या टप्प्यावर त्यांना कोणीतरी सावरणारे आणि मार्गदर्शन करणारे हवे असतात, पालकांना या टप्प्यावर मुलांशी संवाद साधताना निश्चित काहीशा मर्यादा येतात, मग बऱ्याच वेळेस या मानसिक संघर्षामध्ये ही तरुण मुले एकटी पडतात. चुकीच्या कल्पना, शिक्षण आणि मार्गदर्शन यांच्या आहारी जातात आणि याचा शेवट म्हणजे ही मुले व्यसनांच्या विळख्यात सापडतात आणि परमेश्वराने दिलेले हे सुंदर आयुष्य ही मुले अगदी कोवळ्या वयात आत्महत्या करुन उध्वस्त करितात.

म्हणून आजच्या काळाची गरज आहे. टी फॉर टी अर्थात (Training for Teens) ची.

## टी फॉर टी (Training for Teens) मध्ये हाताळले जाणारे विषय :

### १ ले सत्र – कुटुंब

१) परमेश्वराची कुटुंबासाठी योजना
२) देवपित्याचे हृदय
३) कुटुंबामधील नातेसंबंध
४) कुटुंबामधील संघर्ष

### २ रे सत्र – शिक्षण

१) करिअर मार्गदर्शन
  अ) ध्येयबांधणी कशी करावी?
  ब) वेळेचे नियोजन कसे असावे?
  क) शिक्षणाची भिती का वाटते?
  ड) कलाकौशल्यांना वाव
  इ) निराशा व त्यातून बाहेर पडण्याचे मार्ग
२) सामान्य शिष्टाचार व संभाषण कौशल्य
३) जीवनामध्ये शिक्षणाचे महत्त्व
४) ख्रिस्ती शिक्षण काय आहे?

### ३ रे सत्र – प्रेम, लैंगिकता व विवाह

१) विवाहपूर्व मार्गदर्शन व स्वत:वर ताबा
२) प्रेम आणि लैंगिकता, मोह, अश्लील व्हीडीओ पाहणे तसेच प्रसार माध्यमांचा प्रभाव यावर कसा विजय मिळवायचा?
३) निराशा, व्यसनाधिनता व आत्महत्या
४) जीवनासाठी आवश्यक असणाऱ्या तारणाची प्राथमिक मुल्ये

### ४ थे सत्र – देवाला ओळखणे

१) देवाचा स्वभाव गुण
२) पवित्रशास्त्राला जाणून घेणे
३) आध्यात्मिक युध्द – प्रार्थनेचे जीवन
४) देवासोबत शांत समय

### ५ वे सत्र – मिशन व व्हीजन

१) मिशन कार्यासाठी पवित्रशास्त्रीय आधार
२) व्यवसायातून सेवाकार्य
३) मिशनऱ्यांचे जीवनचरित्र
४) एक दिवसीय सहलीचे आयोजन
५) वैयक्तिक दर्शन व निर्णय

## टी फॉर टी ची वैशिष्ट्ये :

- अनुभवी व तज्ज्ञ प्रशिक्षकांकडून मार्गदर्शन.
- सर्व विषय मराठी माध्यमातून शिकवले जातात.
- वर्षभरात T4T चे एकूण ५ सत्रे शिकवले जातात.
- प्रत्येक सत्राचा कालावधी हा ५ दिवसाचा असतो.
- विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून T4T चे प्रशिक्षण शालेय सुट्टीमध्येच घेतले जातात.
- मुलांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा यासाठी कार्यशाळा व सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात.
- प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर प्रमाणपत्र दिले जाते.
- वैयक्तिक मार्गदर्शन व अत्यल्प फी.
- निसर्गरम्य वातावरणात शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी प्रशिक्षण.
- मुलां-मुलींसाठी स्वतंत्ररित्या राहण्याची उत्तम व्यवस्था.

## T4T Training for Teens मध्ये कोण प्रवेश घेवू शकतात?

वय वर्ष १६ ते २४ असणारे फक्त ख्रिस्ती अविवाहीत तरुण तरुणी.

## शब्द मनातले !

आपल्याच विश्वात रममाण असणारी, सोशल मिडीया, अनुचित गोष्टी पाहण्यात व करण्यात मग्न असणारे आणि चुकीच्या तत्वावर जगणारी आजची पिढी. त्यांना कुणाशीच काही देणे घेणे नसते. त्यामुळे आज मंडळ्या, कुटुंब व समाज अस्वस्थ आहेत आणि अशा पिढीमध्ये आपण उद्याचे सेवक, मंडळ्या उभा करणारे पुढारी पाहत आहे. आराधक, सुवार्ता सांगणारे तरुण पाहत आहोत. पण हे घडू शकेल का ? हो निश्चितच घडू शकेल, जर या तरुण पिढीला देवाचे योग्य शिक्षण दिले तर. मला खूप आनंद वाटतो कि तरुण पिढी अंधारामध्ये जगत असताना आज मंडळ्या व कुटुंबाना एक प्रकाशाचा किरण व आशा दिसत आहे ती T4T च्या माध्यमातून. मी खात्रीने हे सांगू शकेन की हे T4T प्रशिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या तरुण व तरुणी मधूनच परमेश्वर त्याच्या राज्यासाठी, मंडळ्यासाठी, समाजासाठी पर्यायाने उद्याच्या भावी पिढीसाठी त्याचे महान सेवक, त्याच्या गौरवासाठी उभा करेल.

– पा. स्किनर थॉमसन
(सिनियर पास्टर, NLF, कोल्हापूर)